दुरध्वनी क्र.(०२११७)-२६२३६९,२६२३७३.
मोबाईल क्र.९८९००५२२६७
ई-मेल- cmdt.srpf7.daund@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

**समादेशक कार्यालय**
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.०७
दौंड-कुरकुंभरोड,तालुका दौंड,जिल्हा पुणे
पिनकोड - ४१३८०१

जा.क्र.समा/रारापोबलगट क्र.७/प्रलि-आशा/सपोशि भरती सन २०२२-२३/नियुक्ती आदेश/२०२५/ 1886    दौंड दि.११/०३/२०२५

**विषय :- सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्तीबाबत..**

***********

**आदेश :-**

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.०७ दौंड येथील पोलीस गट मुख्यालयामध्ये आयोजित केलेल्या सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ प्रक्रियेमध्ये गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारापैकी जे उमेदवार पुर्व चारित्र्य व चारित्र्य पडताळणी मध्ये तसेच वैद्यकीय तपासणीमध्ये पात्र ठरलेले आहेत.प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/पोलीस पाल्य /होमगार्ड /खेळाडु/ माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये निवड झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांची समांतर आरक्षणाच्या प्रमाणपत्राची पडताळणी सत्यता संबंधित कार्यालयाकडुन या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.अशा खालील नमुद उमेदवारांची **मंगळवार** दिनांक ११/०३/२०२५ पासुन महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२०१९ अन्वये वेतनबॅन्ड एस-७ (रु.२१७००-६९१००) या वेतनश्रेणीमध्ये रुपये २१७००/- या वेतनावर सशस्त्र पोलीस शिपाई (गट क) या पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन नियुक्ती करण्यात येत आहे.त्यांना हजर झालेल्या दिनांकापासुन वर नमुद वेतनश्रेणी व त्याखेरीज महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेले सर्व भत्ते मिळतील.त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांना बक्कल नंबर देण्यात येत आहेत.

| अ.क्र | चेस्ट क्र | उमेदवाराचे नाव | जन्म दिनांक | जात | प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३१९ | विशाल भारत भालेराव | ०१/०६/१९९९ | हिंदु - महार | SC | SC/ General | १४६ |
| २ | ६१२८ | महेश राम गाढे | २८/०९/१९९७ | हिंदु - धनगर | NT-C | Open / Home Guard | ३६९ |
| ३ | ८२८६ | तुकाराम आनंदा कोतोरे | ०८/०७/१९८३ | हिंदु - धनगर | NT- C | Open - Ex- Serviceman | ९७९ |
| ४ | १३७० | अक्षय संजय खंडागळे | १९/०७/१९८५ | हिंदु - महार | SC | Open / Police Child | ३३५ |
| ५ | ६०९ | कानिफनाथ उमाजी नरवडे | ०९/०३/१९९६ | हिंदु -मराठा | Open | Anath (Non-institutional) | ८५६ |
| ६ | ६४७० | मयुर सुनिल गायकवाड | १०/११/२००१ | हिंदु - कुणबी | OBC | OBC General | २२९ |
| ७ | ५१५ | वैष्णव भरत शितोळे | १२/१०/२००१ | हिंदु -मराठा | Open | Open/ General | २०२ |
| ८ | ५८१० | वैभव विठ्ठल शेळकंदे | २७/०१/१९९९ | हिंदु - महादेव कोळी | ST | ST/ General | १०७२ |
| ९ | ५९८२ | सचिन शिवाजी महापुरे | ०७/०८/१९९९ | हिंदु - मांग | SC | SC/ General | ६९ |
| १० | ३०१२ | अक्षय मधुकर पांढरे | ११/०९/२००१ | हिंदु - धनगर | NT-C | OPEN General | ६६७ |

**<u>वर नमुद उमेदवारांची खालील अटीवर नेमणुक करण्यात येत आहे.</u>**

१ ार नमूद नियुक्त केलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना राज्य राखीव पोलीस बल अधिनियम १९५१ व राज्य पोलीस बलनियम १९५९ मधील सर्व कायदेशीर तरतूदी लागू होतील.

२ सबंधित उमेदवारास नेमणकीच्या ठिकाणी कर्तव्यार्थ हजर होणेसाठी होणारा प्रवास खर्च त्यांना स्वत: सोसावा लागेल.

३ ३०१ एप्रिल २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकिय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन " राष्ट्रीय निवृत्त योजना ( National Penshion Scheme) लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना ( म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही. " (शासन निर्णय क्र.अनियो१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५) तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.रानियो-

२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४,दि.३१.०३.२०२३ अन्वये मुद्दा क्र.६ मध्ये नमुद प्रमाणे या पुढे शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाप्रमाणे विकल्प शासन सेवेत नियुक्ती झाल्यावर आठ दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहिल.

४ सदर नप्रविष्ठ सशस्त्र पोलीस शिपाई यांना रु.५०००/- इतका मेस ॲडव्हान्स दयावा लागेल.

५ वर नमूद सर्व उमेदवारांची नेमणुक वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र,पुर्व चारित्र्य व चारित्र्यपडताळणी व समांतर आरक्षण प्रमाणपत्र पात्र अहवालानुसार करण्यात आलेली आहे.

६ वर सर्व उमेदवारांची नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रातील कोणत्याही कंपनीत बदली होऊ शकेल.

७ प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवार विनापरावाना गैरहजर / भगोडा राहिल्यास सदर उमेदरवारास कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना नोटीस न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.

८ वरील सर्व उमेदवार यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपेलनंतर पुढील तीन वर्षात सशस्त्र पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास व सदर पदावरुन कार्यमुक्त करण्याची विनंती केल्यास त्यांच्या प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च,तसेच त्यांना अदा केलेले वेतन भत्यासहित वसूल करण्यात येईल.

९ सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर नेमणुक झालेल्या व्यक्तीस मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळाली नाही तर मराठी व हिंदी भाषा परीक्षा यासंबंधित केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हावे लागेल.

१० सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्रक्र-५/२००१/३९, दि.२०/०७/२००२ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT किंवा CCC परिक्षा उत्तीर्ण असलेबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे किंवा सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासुन ०१ वर्षाच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्य विहीत प्रमाणपत्र सादर करावे. सदर विहीत मुदतीत प्रमाणपत्र सादर न करणारा उमेदवार विहीत प्रमाणपत्र सादर करेपर्यंत त्याची वेतनवाढ रोखण्यास पात्र राहील.

११ तात्पुरत्या स्वरुपात सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्त केल्याने सेवाजेष्ठता ही सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना दिनांक २१ जुन २०२१ मधील क्रमांक ३ (२) (ब) (१) मधील तरतुदीनुसार गुणवत्तेनुसार निश्चित करण्यात येईल.

१२ राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाइ पदावर उमेदवारास ज्या राज्य राखीव पोलीस बल गटामध्ये निसुक्ती देण्यात आलेली आहे,त्या गटामध्ये ०५ वर्ष सेवा कालावधी पुर्ण झालेनंतर इतर गटामध्ये बदली होण्यास पात्र असेल तसेच शासन निर्णय,गृह विभाग,शुद्धीपत्रक क्र.पीएमएन-०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब,दि.२१/१०/२०१६ आणि शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या,आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी शर्ती व तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेप्रमाणे जिल्हा पोलीस दलामध्ये बदली होण्यास पात्र असेल.

१३ महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ट पोलीस शिपाई पदासाठी विहीत केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करणे बंधनकारक राहिल व सदर प्रशिक्षणांती घेण्यात येणारी परिक्षा ०४ संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर ०४ संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

१४ महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई(पुरूष) (सेवाप्रवेश)नियम-२०१२ दिनांक ०८/१०/२०१२ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपायांना मुंबई पोलीस नियमावली,१९५९ मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागु होतील.

१५ तीन वर्षांचा अखंड सेवा कालावधी पुर्ण होईपर्यंत मध्यतरीच्या कालावधी उमेदवारांची शिस्त, वर्तणुक व कामगिरी असमाधानकारक आढळुन आल्यास नियुक्ती अधिकारी अशा उमेदवारांची सशस्त्र पोलीस शिपाई या पदावरील सेवा कोणतेही कारण न दाखवता केव्हाही समाप्त करु शकतील, वरील बाबी समाधारनकारक आढळुन आल्यास उमेदवार कायमपणाच्या फायद्याचे प्रमाणपत्र देण्यास पात्र ठरतील.

१६ वर नमुद उमेदवारांची त्यांची त्यांचे नावासमोर दर्शिविलेल्या जात प्रवर्गाच्या आरक्षीत पदातुन सशस्त्र पोलीस शिपाई पदी निव्वळ तात्पूरत्या स्वारूपात नियुक्ती आली आहे त्यांनी त्यांचे जाती दावा पडताळणीचे जात वैधता प्रमाणपत्र हे आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या ०६ महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता

संबंधित जात पडताळणी समितीकडुन करून घेणे बंधनकारक राहिल. आपण नियुक्ती स्वीकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी संबंधित जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी, संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात पडताळणीचे प्रस्ताव ०६ महिन्याचे आत निकाली काढणेबाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल व तुमच्या विरुद्ध महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती , विमुक्त जाती , भटक्या जाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनीमयन) अधिनियम,२००० कलम १० च्या तरतुदीनुसार त्यांना सेवेतुन तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

१७ नवप्रविष्ठ सशस्त्र पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र राज्यात व गडचिरोली , गोंदिया ,चंद्रपुर इ. नक्षलग्रस्त भागात तसेच दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याबाहेर देशभरात कोठेही कर्तव्यासाठी पाठविण्यात येईल, दिलेले कर्तव्य नाकारणार नाहीत.

**(राजलक्ष्मी शिवणकर)**
**समादेशक**
**राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.०७ दौंड**

**प्रति,**

संबंधित सर्व उमेदवार समक्ष.

**मार्फतीने सादर ,**

स्थानिक कंपनी नायक,रारापोबल,गट क्र.०७ दौंड.

२/- वरील नमूद सर्व संबंधित उमेदवारांना नियुक्ती आदेशाची मुळ प्रत अदा करून त्यांची दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

३/- वरील उमेदवारांचे प्रशिक्षण पुर्ण होईपर्यंत स्थानिक कंपनीमध्ये नेमणुक करण्यात येत असुन, प्रशिक्षण पुर्ण होताच त्यांना इतर संचार कंपनीमध्ये नेमणुक देण्यात येईल. सदर उमेदवारांकडून रूपये ५०००/-इतका मेस ॲडव्हॉन्स म्हणुन घेण्यात यावा. तसेच नप्रपोशि हजर झालेनंतर त्यांचा हजर दिनांक नामावलीसह या कार्यालयास सादर करावा.

४/- शासन अधिसुचनेनुसार लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.अधिसुचनेतील नियम ४ अ नुसार हयात मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ व तद्नंतर जन्माला आलेला मुलामुळे अनर्ह करण्यात पात्र राहील.सदरचे प्रमाणत्र घेवून या कार्यालयास सादर करावे.

५/- कंपनी नायक यांनी नप्रपोशि यांचे वेतनासाठी बँक खाते उघडावे तसेच नविन अंशदान पेन्शन योजनेचे फॉर्म व नामनिर्देशन फॉर्म भरुन त्याबाबतची कार्यवाही पुर्ण करुन घ्यावी.

**प्रत ,**

पोलीस निरीक्षक गट भांडार, रारापोबल, गट क्र.०७ दौंड.

२/- वर नमूद उमेदवारांना सरकारी सरंजाम अदा करुन पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत,**

**लेखा शाखा, रारापोबल,गट क्र. ०७ दौंड**

२/- नमुद उमेदवारांची नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना अंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म भरून घ्यावे व त्यांचे सेवार्थ मधील वेतनाबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**प्रत कार्यवाही करीता,**

पोलीस लेखापाल/गटराजपत्र/पत्रव्यवहार शाखा/आशा-२,३,४/नियंत्रण कक्ष,रारापोबलगट,क्र.०७ दौंड

२/- नियंत्रण कक्ष यांनी नमूद उमेदवारांना सोबत येताना आधार कार्ड,पॅनकार्ड,१० फोटो,मेस अग्रिम करिता ५०००/- रुपये लाईट बेंडींग व जात पडताळणीकरिता आवश्यक सर्व कागदपत्रे घेवून येणेबाबत सुचित करावे.

**प्रत व माहितीस्तव सविनय सादर,**

मा अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
मा अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
मा विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस,पुणे परिक्षेत्र,पुणे.

प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,

मा.पोलीस महासंचालक,म.राज्य,मुंबई (लक्षवेध :- संगणक कक्ष)

२/- नमूद उमेदवारांच्या नियुक्ती आदेशाची प्रत महाराष्ट्र पोलीस वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी, हि विनंती.